प्रसनाट दिनांक:- २६/०९/२०२५

ठाणे शहर पोलीस आयुक्तालय
पोलीस उपायुक्त परिमंडळ २, भिवंडी

फॉरेन्सिक युनिट उद्घाटन समारंभ

----------ooo---------

मा. पोलीस आयुक्त, ठाणे श्री. आशुतोष डुंबरे व मा. पोलीस सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली आज दि. २६/०९/२०२५ रोजी पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, भिवंडी कार्यालयामध्ये फॉरेन्सिक युनिट व फॉरेन्सिक व्हॅन उद्घाटन मा. अपर पोलीस आयुक्त (प.प्रा.वि.) श्री विनायक देशमुख यांचे शुभहस्ते करण्यात आले आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कायदयाच्या अंमलबजावणीकरीता महाराष्ट्र राज्यात एकुण २५९ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित करण्याकरीता गृह विभाग शासन निर्णय कमांक एफ.एस.एल - ०४२४/प्र.क. २०५/पोल-४, दि.२२/०७/२०२४ व गृह विभाग शासन निर्णय कमांक एफ.एस.एल -०४२४/प्र.क. २०५/पोल-४, दि.२२/०५/२०२५ अन्वये शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन प्रकल्पाचे लोकार्पण दिनांक २७/०१/२०२५ रोजी मा.ना.श्री देवेद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

सदर फॉरेन्सिक युनिटमध्ये प्रशिक्षित स्टाफ नेमण्यात आलेला असून फॉरेन्सिक व्हॅनमध्ये गंभीर गुन्हयातील पूरावे शास्त्रशुध्दपणे गोळा करण्याकरीता आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. परिमंडळ-०२ भिवंडीत दाखल होणा-या ७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गंभीर गुन्हयांची उकल होणेकरीता फॉरेन्सिक युनिटचा व फॉरेन्सिक व्हॅनचा उपयोग होणार आहे.

पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, भिवंडी कार्यालयातील फॉरेन्सिक युनिट व फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन कार्यकमासाठी मा. अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे) श्री विनायक देशमुख, यांचे हस्ते झाले असून त्यावेळी पोलीस उप आयुक्त शशिकांत बोराटे, सहा. पोलीस आयुक्त, सचिन सांगळे, व विजय मराठे,तसेच ०६ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, फॉरेन्सिक टिम तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



